# भाषाशुद्धीचे व्रत

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे).‘*’ या चिन्हाने दर्शवली आहेत.)


- मनोगत ५
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील ‘एक विद्वान’ यांनी केलेले भाष्य ८

१. परकीय शब्दांमुळे स्वभाषेतील शब्द नाहीसे होण्याची उदाहरणे, कारणे आणि प्रक्रिया १३
२. भाषाशुद्धीचे विरोधक आणि त्यांच्या मतांचे खंडण २२
* अहो ! भाषा भाषेस बळी पडणें ही नियतीच आहे ! २३
* आपले ते वाईट आणि विदेशी ते चांगले, असे समजणारी मनोवृत्ती २५
३. भाषाशुद्धीचा इतिहास २६
* स्वकीय भाषेच्या रक्षणार्थ प्रयत्न करणारे थोर हिंदू २७
४. भाषाशुद्धीचे महत्त्व ३९
५. भाषाशुद्धीची कारणे ४१
* हा प्रश्न एखाद दुसऱ्या शब्दाचा नाही, तर प्रवृत्तीचा असणे ४१
६. भाषाशुद्धीची मूलतत्त्वे ४२
* स्वकीय आणि विदेशी शब्द वापरण्याचे नियम ४२
७. स्वकीय शब्दांच्या रक्षणार्थ उपाय ४५
* इंग्रजी आणि उर्दू शब्द बोलल्यास प्रायश्चित्त घ्या ! ४७
* संस्कृत भाषेचा वापर करा ! ४८
८. व्याकरण महत्त्वाचे आहे ! ४९
* व्याकरणाविना भाषा माणसाला ओंगळच करील ! ५३
* व्याकरणाचे महत्त्व न कळणारे विविध सामाजिक घटक ५३
९. भाषाशुद्धीच्या चळवळीचा प्रभाव ५४
१०. सनातन संस्थेची भाषाशुद्धीची चळवळ ५६

# मनोगत

१. मराठी भाषेची केविलवाणी सद्यस्थिती‘बोली आणि लेखन या संदर्भात मराठी भाषेची स्थिती किती केविलवाणी झाली आहे, हे घरीदारी बोलल्या आणि लिहिल्या जाणाऱ्या मराठीवरून कोणाच्याही लक्षात येईल. मराठी भाषेच्या रक्षणासाठी काय प्रयत्न करायला हवेत, याचे विवेचन सनातनच्या ‘मराठीला जिवंत ठेवा !’ या ग्रंथात करण्यात आले आहे. भाषेविषयी सर्वसाधारण ज्ञान सनातनच्या ‘तामसिक इंग्रजीच्या तुलनेत सात्त्विक मराठी भाषा श्रेष्ठ !’, तसेच भाषाविषयक अन्य ग्रंथांत दिले आहे.

२. भाषाशुद्धी : एक साधना !

अ. पंडितांनी सहदाो वर्षे अत्यंत परिश्रम घेऊन संस्कृत भाषेचे मूळ शुद्ध रूप टिकवले आहे; म्हणून तिच्यात चैतन्य आहे. या भाषेमुळे वाईट शक्तींना कसा त्रास होतो, हे दर्शवणाऱ्या अनेक ध्वनीचित्र-चकत्या (व्हिसीडी) सनातनकडे आहेत.

आ. शुद्ध मराठी न बोलता अशुद्ध मराठी बोलल्यास तिचा वाईट शक्तींना त्रास होत नाही, हे दर्शवणाऱ्याही अनेक ध्वनीचित्र-चकत्या सनातनकडे आहेत.

इ. जेथे उच्चारांची शुद्धता असते, तेथे पावित्र्य असते आणि आणि ईश्वरी तत्त्व आकृष्ट होते.

ई. ईश्वर परिपूर्ण आहे. आपणही संस्कृत भाषेनंतर परिपूर्ण असलेली, म्हणजे शुद्ध मराठी भाषा वापरली, तर ईश्वराच्या दिशेने जायला आपल्याला साहाय्य होते. (येथे केवळ भाषेच्या संदर्भात विचार केला आहे. तळमळ, भाव इत्यादींचा विचार केलेला नाही.)

३. उपाय

संस्कृतप्रमाणेच मराठीची स्थिती झाली, तर ज्ञानेश्वरी, दासबोध, संत तुकाराम महाराजांची गाथा, तसेच इतर संतांचे वाङ्मय इत्यादींतील सर्वोच्च ज्ञानाला आपण मुकू. एवढेच नाहीतर संस्कृत आणि मराठी भाषा नष्ट होऊ देणे, हा मानवजातीच्या संदर्भात अक्षम्य अपराध होईल. तो टाळण्यासाठी आताच जिवाच्या आकांताने प्रयत्न केले पाहिजेत. आता परत भाषाभिमानाची चळवळ आरंभ करून मराठी, तसेच संस्कृत यांना त्यांचे पूर्वीचे गौरवस्थान मिळवून देऊया. त्यासाठी प्रथम शुद्ध मराठी बोलूया आणि तिचा प्रचार करूया. त्या संदर्भात दिशादर्शन होण्यासाठी हा ग्रंथ प्रकाशित करत आहोत.

**४. भाषाशुद्धीचे वैशिष्ट्य**

भाषाशुद्धी हा राष्ट्रहिताचा आणि स्वत्वरक्षणाचा असा विषय आहे की, जो प्रत्यक्षात आणतांना रक्तही (तन) सांडावे लागणार नाही वा द्रव्यही व्यय (खर्च) होणार नाही. त्यासाठी

केवळ मनोनिग्रह हवा !

## ५. स्वा. सावरकर यांचे लिखाण लिहिण्यासाठी आम्ही वापरलेली पद्धत

'भाषाशुद्धी' या ग्रंथात स्वा. सावरकर यांनी मराठी लिपी थोडीफार इंग्रजीप्रमाणे लिहिली आहे, उदा. 'अर्थ' हा शब्द 'अर्‍थ' असा लिहिला आहे. वाचकांना विषय समजून घेणे कठीण जाऊ नये; म्हणून आम्ही नेहमीच्या पद्धतीनेच ('अर्थ') सर्व शब्द लिहिले आहेत. मात्र स्वा. सावरकरांचे इतर लिखाण शक्यतो मूळ स्वरूपात ठेवले आहे. याचे कारण हे की, भाषेचे सौंदर्य,प्रतिभा, सूत्र (मुद्दा) ठामपणे आणि प्रखर बुद्धीवादाने पटवून देण्याचे कौशल्य, भाषेतील तेजतत्त्व इ. त्यांच्या वैशिष्ट्यांशी कोणालाही स्पर्धा करता येणार नाही.

## ६. भाषाशुद्धीचा शब्दकोश

मराठी भाषेत घुसलेल्या इतर भाषिक शब्दांना असलेले मराठी प्रतिशब्द भाषाशुद्धीचे व्रत अंगीकारणाऱ्यांना कळावेत, यासाठी 'भाषाशुद्धीचा शब्दकोश' हा निराळा ग्रंथसुद्धा आम्ही प्रकाशित करणार आहोत.

## ७. वाचकांना विनंती

वाचकांना ठाऊक असलेले किंवा सुचलेले इंग्रजी, फारसी, उर्दू आदी भाषांतील शब्दांचे प्रतिशब्द त्यांनी आमच्याकडे पाठवावेत. परकीय शब्दांना आम्ही वापरत असलेल्या मराठी प्रतिशब्दांच्या ठिकाणी दुसरे चांगले शब्द सुचल्यास तेही कळवावेत. सनातन-निर्मित ग्रंथ आणि अन्यत्र मराठी प्रतिशब्द वापरण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न केला जाईल.

## ८. प्रार्थना

हा ग्रंथ वाचून जास्तीतजास्त जणांना मराठी भाषा शुद्ध स्वरूपात ठेवण्यासाठी आणि तिचे चैतन्य टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यास स्फूर्ती मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना !'

**- संकलक.**